संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला २५ जूनला

### श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयात संपन्न होणार व्याख्यान कार्यक्रम

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व डॉ. कमलताई काशीराव देशमुख, नागपूर यांचेकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील डॉ.सी.व्ही. रमण सभागृहात मंगळवार, दि. २५ जून, २०१९ रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषविणार असून 'इंजिनिअरींग द नॅनोमटेरीअल्स फॉर देअर मेडीकल अप्लीकेशन्स' या विषयावर सी.आर.टी.डी., सिंहगड संस्था, सोलापूरचे संचालक तथा डी.वाय. पाटील व श्री शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.एस.एच. पवार सन्माननीय वक्ते म्हणून अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील. याप्रसंगी दानदाते डॉ. कमलताई काशीराव देशमुख, नागपूर यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

व्याख्यानमालेकरिता सर्व नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.जी. ठाकरे यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २०/०६/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी